


Scanned by CamScanner

भारतीय समाजव्यवस्था आणि स्त्री

**Bhartiya Samajvyavastha ani Stree**

**ISBN-978-81-925804-1-8**

**संपादक**

डॉ. प्रतिभा अहिरे

प्रा. वंदना बनकर

**प्रथम आवृत्ती** : १ जुलै २०१३

**प्रकाशक**

भारत जमधडे

ए–१२०, एफ–१५/१५, एन–६, सिडको, औरंगाबाद

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

भारत जमधडे

एफ ४०/५, अयोध्यानगर, एन–७, सिडको, औरंगाबाद

मो. ९०४९५९१७४७, ८१७७८०३२१६

**Email :** apoorvjamdhade@rediffmail.com
bharatjamdhade1976@gmail.com

**प्रकाशनाचे सर्व अधिकार** – भारत जमधडे

| | |
|---|---|
| **मुखपृष्ठ** | : राजानंद सुरडकर |
| **मुखपृष्ठ मांडणी** | : सरदार जाधव |
| **अक्षर जुळवणी** | : यजुवेन्द्र वनकर |
| **मुद्रक** | : रूद्रायणी ऑफसेट |
| **स्वागत मूल्य** | : १६० ₹ |

---

**टीप** – या अंकातील लेख संबंधीत लेखकांचे आहेत. या अंकात व्यक्त झालेल्या मताशी संपादक मंडळ, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे नाव | | लेखकाचे / लेखिकेचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| १) | कौटुंबिक हिंसाचार आणि कायदा | – | प्रा. प्रतिभा गडवे | ८ |
| २) | कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप | – | प्रा. मधुकर आत्माराम देसले | १५ |
| ३) | भारतीय शिक्षण व्यवस्थेतील स्त्रियांची स्थिती | – | प्रा. डॉ. रश्मी बंड | २१ |
| ४) | भारतीय पुरूषप्रधान संस्कृति आणि स्त्रियांचे प्रश्न, समस्या व उपाय | – | प्रा. जोत्स्ना संभाजी पुसाटे | २६ |
| ५) | महिला सबलीकरणातील समस्या | – | प्रा. एच.पी. पारधी | ३२ |
| ६) | राजकारणातील महिलांचे स्थान | – | प्रा. अरविंद घोंगडे | ३६ |
| ७) | भारतातील क्रांतिकारी चळवळीतील स्त्रियांचे योगदान | – | प्रा. रेखा लालाजी मेश्राम | ४३ |
| ८) | स्त्री भ्रूणहत्येचे सामाजिक परिणाम | – | डॉ. प्रगती नरखेडकर | ४८ |
| ९) | भारतीय राजकारणात स्त्रियांचे स्थान | – | डॉ. अनिल सी. बनकर | ५६ |
| १०) | स्त्री–भ्रूणहत्या : एक सामाजिक कलंक | – | प्रा. सुधाकर नथ्थु जावळे | ६३ |
| ११) | स्त्रीवादाची परंपरा आणि स्वरूप | – | डॉ. मीना खरात | ७० |
| १२) | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्रीविषयक भूमिका व कार्य | – | प्रा. भानुसे कारभारी लक्ष्मण | ७५ |
| १३) | प्राचीन महाराष्ट्रीयन स्त्रियांचा धनाधिकार | – | डॉ. भलोंडे जगदिश | ८१ |
| १४) | भारतीय समाज व्यवस्थेतील स्त्री वर्गाच्या समस्या : स्त्री शिक्षण एक उपाय | – | डॉ. रावसाहेब नेरकर | ८८ |
| १५) | भारतीय स्त्रियांचा बदलता दर्जा व समस्या | – | प्रा. शेटे एस.बी. | ९४ |
| १६) | सामाजिक जीवनातील स्त्रियांची सुरक्षितता | – | डॉ. हेमलता नरेश तुरणकर | १०४ |


Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| १७) | भारतीय इतिहासातील स्त्रिया | – प्रा. जाधव दिलीप रामचंद्र | १०८ |
| १८) | महिला सबलीकरणापुढील समस्या | – प्रा. डॉ. सुजाता गायकवाड | ११३ |
| १९) | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीमुक्तीविषयक विचार | – किशोर उघडे | ११७ |
| २०) | स्त्रियांचे साहित्यातील स्थान | – अभिषेक गायकवाड | १२२ |
| २१) | शिक्षण व्यवस्थेतील स्त्रियांची स्थिती | – प्रा. वैशाली जे. रगडे | १२८ |
| २२) | स्त्री सबलीकरण : वास्तव आणि समस्या | – डॉ. निलिमा राजेंद्र बनकर | १३६ |
| २३) | स्त्रियांचे राजकारणातील स्थान | – प्रा. राहुल पंडित | १४२ |
| २४) | मनोसामाजिक घटकांचा स्त्रियांच्या व्यक्तिमत्वावर होणारा परिणाम | – प्रा. खिल्लारे संदिप | १४६ |
| २५) | वैवाहिक समायोजन : काळाजी गरज | – डॉ. पुष्पा भाग्यवंत | १५० |
| २६) | महिला सबलीकरणात बचत गटाची भूमिका | – प्रा. वंदना बनकर | १५६ |
| २७) | भारतीय समाजातील स्त्रियांचा कनिष्ठ दर्जा : एक विश्लेषण | – प्रा. रमेश गुडदे | १६२ |
| २८) | साहित्य आणि स्त्री | – राजानंद सुरडकर | १६७ |
| २९) | भांडवलशाही आणि स्त्री | – डॉ. भाऊसाहेब झिरपे | १७० |
| ३०) | जागतिकीकरणाचा महिलांच्या दर्जावर झालेला परिणाम | – प्रा. डॉ. प्रतिभा अहिरे | १७३ |
| ३१) | प्रशासकीय व्यवस्थेत स्त्रियांचे स्थान व समस्या | – डॉ. एम.एफ. राऊतराहे | १७६ |


Scanned by CamScanner

# स्त्रियांचे राजकारणातील स्थान

- प्रा. राहुल पंडित,
श्री शिवछत्रपती महाविदयालय जुन्नर, जि.पुणे

**प्रस्तावना :**

आज महिला सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत. भारतात बदलत्या परिस्थितीनुसार सामाजिक, शैक्षणिक, राजकिय, सांस्कृतिक, आर्थिक व अन्य क्षेत्रात महिलांनी आपला सहभाग नोंदविला आहे; परंतु भारतीय राज्यघटनेतील तरतुदीनुसार समानतेच्या तत्वाचा फायदा म्हणावा त्या प्रमाणात स्त्रियांना झाला नाही. यास पुरुषप्रधान संस्कृती कारणीभूत आहे. आज जरी स्त्रियांनी आपले जीवनमान उंचावले असले तरी तिच्यावर कोणत्या ना कोणत्या प्रकारे पुरुषप्रधान संस्कृतीद्वारे अन्याय होत असतो. स्त्रियांच्या व्यक्तिमत्वाचा विकास घडविण्याऐवजी त्यांचा ऱ्हास कसा होईल याच दृष्टीने सध्या वाटचाल सुरु आहे. सद्यस्थिती अशी आहे की स्त्रियांना अनेक समस्यांना पुढे जावे लागत आहे. वर्तमानपत्र व प्रसारमाध्यमांद्वारे आपणांस दैनंदिन स्त्रियांवर होणारे अन्याय बघावयास मिळतात. एक उपभोगाची वस्तु म्हणुन स्त्रियांकडे बघितले जाते. स्त्री भ्रूणहत्या, बलात्कार, मानसिक छळ असे प्रकार रोज घडत असताना दिसतात.

प्राचीन काळी विशेषतः बुध्द आणि ख्रिस्त धर्मामध्ये स्त्रियांना समान वागणूक मिळत होती. बौध्द तत्ववेत्ती विदुषी निस्तेने असे म्हटले आहे की, पुरुषांनी हे जग क्रूर, कठोर, हिंसक, रक्तपिपासु बनविले आहे. स्त्रिया प्रेम व करुणेद्वारे चांगले काही करु शकतात हे त्यांना कधीच कळले नाही. मनुस्मृतीमध्ये तर स्त्रियांना अत्यंत गौण स्थान दिले होते. त्यांना स्वतंत्र अस्तित्व प्रदान केले नव्हते. स्त्री ही लहानपणी वडिलांच्या आज्ञेत, तरुणपणात नवऱ्याच्या आज्ञेत व म्हातारपणी मुलांच्या आज्ञेत असावी असे म्हटले आहे.

भारतीय राज्यघटनेतील तरतुदीनुसार स्त्री-पुरुष समानता प्रदान केली आहे. त्यानुसार स्त्रीभ्रूण हत्या बंदी, बालविवाह बंदी, हुंडाबंदी, समान कामासाठी समान वेतन इ. महत्त्वपूर्ण कायद्यांची निर्मिती करुन महिला विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महिलांची शैक्षणिक स्थितीही सुधारलेली दिसते व भारतीय राजकारणात महिलांचे सहभागित्व वाढताना दिसते. अनेक महत्त्वपूर्ण पदावर महिला विराजमान झाल्या आहेत. देशाच्या ध्येयधोरण निर्मिती व अंमलबजावणीमध्ये महिला महत्त्वाची भूमिका बजावू लागल्या आहेत. जागतिक स्तरावर १९ देशांच्या प्रमुखपदी म्हणजे राष्ट्राध्यक्ष किंवा पंतप्रधान महिला आहेत. भारतीय संसदेत सध्या ६० 'महिला खासदार आहेत. तसेच स्थानिक शासनामध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण दिलेले असल्यामुळे महिलांची संख्या वाढली आहे. हे खरे असले तरी अनेक दिवसांपासून महिलांना विधानसभेत व लोकसभेत ३३ टक्के आरक्षण असले पाहिजे ही मागणी अजुनसुध्दा मान्य झालेली नाही.

**भारतीय राजकारण व महिला -**

भारताला स्वातंत्र्य मिळवुन देण्यासाठी स्वातंत्र्य चळवळीत अनेक महिलांनी योगदान दिले आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात १९५२ मध्ये लोकसभेची पहिली सार्वत्रिक निवडणुक घेण्यात आली. तेव्हापासून आतापर्यंत लोकसभेच्या १५ सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. मात्र त्यामध्ये निर्वाचित स्त्रियांची संख्या अत्यंत कमी दिसून येते. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत ४९९ सदस्यांपैकी फक्त २२ स्त्रिया होत्या १९५७ च्या दुसऱ्या सार्वत्रिक लोकसभेच्या निवडणुकीत ५०० सदस्यांपैकी २७ स्त्रिया निर्वाचित झाल्या. १९६२ च्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत ५०३ निर्वाचित सदस्यांपैकी ३४ स्त्रिया होत्या. चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीत ५२३ निर्वाचित सदस्यांपैकी ३१ स्त्रिया होत्या. १९७१ च्या पाचव्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकात ५२१ निर्वाचित सदस्यांपैकी २२ स्त्रिया निर्वाचित सदस्य होत्या. १९७७ च्या सहाव्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकात ५४४ सदस्यांपैकी ३८ निर्वाचित महिला सदस्या होत्या. १९८० च्या सातव्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूक निकालात ५४४ सदस्यांपैकी ३८ महिला निर्वाचित सदस्या होत्या. १९८४, १९८९, १९९१, १९९६, १९९८, १९९९, २००४ व २००९ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत एकुण निर्वाचित सदस्या पैकी अनुक्रमे ४४, २७, ३९, ३९, ४३, ४९, ४४ व ६० निर्वाचित महिला सदस्य आहेत.

पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून महिला प्रतिनिधीत्व बघितल्यास ते तुलनात्मकदृष्ट्या अत्यंत कमी दिसुन येते. २००९ मध्ये झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत मागील निवडणुकांपेक्षा जास्त महिला सदस्य आढळुन येतात; परंतु एकुण सदस्यांच्या तुलनेत ही टक्केवारी किंवा जागा अत्यंत कमी आहेत. तसेच महिलांना अत्यंत कमी प्रमाणात मंत्रीपरिषदेत स्थान देण्यात आले आहे. त्या त्या घटकराज्यामध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकामध्येही निर्वाचित सदस्यामध्ये महिला नगण्य राहिल्या आहेत. महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याच्या

TRUE COPY
offg. Principal
S. S. C. College Junnar (Pune)





Scanned by CamScanner

संदर्भात काँग्रेस, भाजपा व अन्य पक्षांनी सहमती दर्शविली आहे; परंतु आजपर्यंत संसदेमध्ये ते बिल पास होऊ शकले नाही.

१९५२ पासुन आतापर्यंत फक्त १४ महिला मुख्यमंत्री झाल्या आहेत. त्यामध्ये सुचेता कृपलानी - उत्तरप्रदेश, नंदीनी सत्पथी - ओरीसा, सईदा अन्वर तैमुर - आसाम, जानकी रामचंद्रन - तामीळनाडु, जयललिता -तामीळनाडु, मायावती - उत्तरप्रदेश, राजेंद्र कौर भटटल - पंजाब, राबडीदेवी - बिहार, सुषमा स्वराज - दिल्ली, शीला दीक्षित - दिल्ली, उमाभारती - मध्यप्रदेश, वसुंधराराजे सिंधिया - राजस्थान, ममता बॅनर्जी - पश्चिम बंगाल इ. चा समावेश होतो. वरील महिला मुख्यमंत्र्यापैकी काहींनी अल्पकाळ सत्ता उपभोगली तर काहींनी दीर्घकाळ सत्ता उपभोगली. खेदजन्य बाब अशी की जरी ह्या महिला मुख्यमंत्री पदी विराजमान झाल्या असल्या तरी त्यांच्या मंत्रिमंडळात व पक्षात महिलांना नगण्य स्थान दिलेले आहे. सध्या जरी काँग्रेस पक्षांचे सर्व सत्तासूत्रे सोनिया गांधी यांच्या हातात असली तरी महिलांना प्राधान्य देण्यात त्या अयशस्वी राहिल्या आहेत. देशाच्या सर्वोच्च पदी म्हणजे राष्ट्रपती म्हणून प्रतिभाताई पाटील होत्या; परंतु त्यांच्या कारकिर्दित महिलांवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांना दया व माफी दाखविण्याचे काम झाले आहे. मायावती यांनी उत्तर प्रदेशात दलित महिला मुख्यमंत्री होण्याचा मान मिळविला. त्यांनी महिला व दलित विकासास सहकार्य करणारे धोरण हाती घेतले; परंतु त्यांच्या धोरणास पुरुषप्रधान संस्कृतीने व मनुवादी विचारसरणीच्या लोकांनी विरोध केला आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात आतापर्यंत एकही महिला मुख्यमंत्री म्हणुन नियुक्त झाली नाही. तसेच विधानसभेतील निर्वाचित महिलांचे प्रमाणही कमी आहे.

स्थानिक शासनामध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण दिलेले असल्याने महिलांना स्थानिक शासनांत महत्त्वपूर्ण पदे मिळवण्यास सहकार्य झाले आहे; परंतु त्यांच्या अधिकाराचा वापर त्यांच्या घरचे कर्ते पुरुष करताना दिसतात. त्यामुळे महिलांनी स्वत: निर्णय हे स्वत: घेऊन महिला विकासास सहकार्य करण्याची गरज आहे.

## निष्कर्ष :

प्रत्येक सामाजिक व्यवस्थेत महिला ह्या महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. महिलांशिवाय समाजाची संकल्पनाही करता येत नाही. स्त्री ही चार

TRUE COPY
offg. Principal
S. S. C. College Junnar (Pune)



भिंतीच्या आत राहणे व चूल आणि मूल इथपर्यंत मर्यादित विचार बाळगल्याने व स्त्रीची मानसिकताच तशी बनविल्याने ती अन्य क्षेत्रापासुन दूर राहिली आहे. राजकारण हा तसा पुरुषांचा प्रांत म्हणून ओळखला जातो. स्त्री जशी कुटुंबाचा विकास करु शकते तसा देशाचाही विकास करु शकते हे मत पुरुषप्रधान संस्कृतिला मान्य नाही. २००१ हे महिला सबलीकरण वर्ष म्हणून ओळखले जाते. भारतीय राज्यघटनेत त्यांचा विकास साध्य करण्यासाठी पुरेशी तरतूद करण्यात आली आहे. तरीपण योग्य अंमलबजावणी झालेली नसल्याने त्यांचा इतर क्षेत्रातील टक्का वाढला नाही. मानवी हक्क संघटनेने व भारतीय राज्यघटनेत महिलांचे हक्क सुरक्षित राहण्यासाठी तरतुदी केल्या आहेत. त्यामध्ये सर्वक्षेत्रात स्त्रियांना समान अधिकार देणे, लैंगिक छळ, शोषण व स्त्रियांची अडवणूक तसेच लिंगभेदाचेही निराकरण झाले पाहिजे. त्यांना शक्तिशाली बनविले पाहीजे, त्यांना आयुष्यात उच्च दर्जा दिला पाहिजे इ. व अन्य बाबीतून महिलांचा विकास साध्य होऊ शकतो. त्यांना आरक्षण देऊन त्यांची संख्या वाढविली जाते; परंतु राजकारणात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. तरी पण आज भारतीय राज्यघटनेतील तरतुदीचा आधार घेऊन महिला ह्या मोठ्या प्रमाणात राजकारणात येताना दिसतात. तसेच महत्त्वाची पदे ही मिळवत आहेत; परंतु गरज आहे ती अर्ध्या भागीदारी तत्त्वाची.

## संदर्भ सूची -

१) भारतीय राजकारणातील. स्त्रिया - डॉ. मोहिनी कडु, विजय प्रकाशन नागपुर - २००८.

२) भारतीय राजनीति और महिलाएँ - स्वप्नील सारस्वत, अक्षरांकन प्रकाशन, नोएडा- २००३

३) दैनिक वृत्तपत्र पुढारी - ८/३/१३

४) दैनिक वृत्तपत्र लोकमत - ८/३/१३

५) भारताची जनगणना २०११

६) मानवाधिकार, नेहरु और आंबेडकर, - चन्देल धर्मवीर, पोईन्टर पब्लीशर्स - २०११

-❀❀❀-



Scanned by CamScanner